स्थायी समितीच्या शुक्रवार दिनांक 19–01–2018 रोजी दुपारी 12–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 7. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 9. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 10. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 11. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 12. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 13. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 14. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 15. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. आर.झेड. सिद्दीकी, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 388:– {आरोग्य विभाग (एस)} नागपूर महानगरपालिका हद्दीतील मोकाट श्वानांच्या नंसबंदी शस्त्रक्रिया व अ‍ॅन्टीरेबीज लसीकरण कार्यक्रम राबविण्याकरीता स्थायी समिती ठराव क्र. ४३५ दि. २९/०८/२०१६ नुसार शासकिय पशुवैद्यकीय महाविद्यालय नागपूर यांचे मार्फत राबविण्यात येत असून शासकिय पशुवैद्यकीय महाविद्यालय मार्फत राबविण्यात येणारी नसबंदी मोहीम अल्प प्रमाणात म्हणजे दिवसाला १ नसबंदी सुरु असल्यामुळे स्थायी समिती ठराव क्र. ८२, दि. २३/०६/२०१७ नुसार अभिरुची प्रगटन (Expression of Interest) प्रसिध्द करण्यात

आले. या EOI मध्ये व्हेट्स फॉर ॲनिमल, कोपर्डे हवेली, ता. कराड, जिल्हा— सातारा व नागपूर एस.पी.सी.ए., नागपूर या दोन सेवाभावी संस्था सहभागी झाल्या.

EOI मध्ये सहभागी संस्था व्यतीरिक्त पिपल्स फॉर अनिमल, वर्धा यांनी मनपा स्थायी समिती ठराव क्र. ८२, दि. २३/०६/२०१७ नुसार निश्चित केलेल्या प्रति श्वान ७००/— दरानुसार व मनपा शर्ती—अटीनुसार या मोहीमेमध्ये सहभागी होण्याकरीता प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर संस्था तांत्रीक बाबींची पुर्तता करीत आहे. सदर संस्था EOI मध्ये सहभागी झाली नसल्यामुळे व विना निविदा त्यांना काम देणे असल्यामुळे सक्षम प्राधिकरण म्हणून मा. स्थायी समीतीची मंजुरी आवश्यक आहे. इतर सेवाभावी संस्था मोकाट श्वानांच्या नसबंदी शस्त्रक्रिया व ॲन्टीरेबीज लसीकरण कार्यक्रमामध्ये सहभागी झाल्यास सदर उपक्रमाअंतर्गत मोठया प्रमाणात मोकाट श्वानांच्या नसबंदी शस्त्रक्रिया कमी कालावधीमध्ये पार पाडण्यास मदत होईल.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव समितीने विचारात घेऊन विस्तृत अहवाल सादर करावा व परत स्थायी समिती समोर ठेवा या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 389ः— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 25, (ब) शिवनगर, भांडेवाडी येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. 43,81,652/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 390ः— {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 6 (अ) अंतर्गत सुजाता नगर हॉऊसिंग बोर्ड व पंचशिल नगर येथे ड्रेन लाईन टाकण्यास्तव व सी.सी. रोडचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त निविदापैकी मे. उल्हास इंन्टरप्राजेस यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 49,99,934/— पेक्षा 14.98 टक्के कमी दराची रू. 42,50,943/—(रूपये बेचाळीस लक्ष पन्नास हजार नऊशे त्रेचाळीस) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसचे हे काम पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 391ः— {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. २६ (क) अंतर्गत शक्तीमाता नगर व शेषनगर येथील रोडचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण दोन निविदाकाराची निविदांपैकी मे. डी. सी. गुरूबक्षानी यांची प्राक्कलनीय दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. 26,51,210/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 392ः— {उद्यान विभाग} प्रभाग क्र. 11 (अ) गोरेवाडा, बरडे लेआऊट येथे उद्यान विकसित करण्याकरिता विविध कामे करण्याचे रू. 72,52,500/—( अक्षरी बाहात्तंर लक्ष बावन हजार पाचशे फक्त) रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास तसेच या कामाच्या निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 393ः— {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र ११ अ बन्धूनगर, बाबा फरीदनगर झिंगाबाई टाकळी येथे सिवर लाईनचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई — निविदातील प्राप्त एकुण ४ निविदापैकी मे. पवन नरसन्ना येलचेट्टी यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा १३.१९% कमी दराची राशी रू. ३३,१७,१५२/— (तेहत्तीस लक्ष सतरा हजार एकशे बावन्न रूपये फक्त) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 394:— प्रभाग क्र ११, ब जयदुर्गा सोसायटी गोधणी रोड येथे
{लोककर्म झोन 10} कंपाऊडवॉल आणि फुटपाथचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई — निविदातील प्राप्त एकुण ७ निविदापैकी मे. इमरान अंसारी यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा १५.२०% कमी दराची राशी रू. २५,७६,८०२/— (पंचवीस लक्ष छत्तर हजार आठशे दोन फक्त) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 395:— प्रभाग क्र ११ अ महेशनगर बोरगांव येथे नाल्याचे भिंतीचे
{लोककर्म झोन 10} कामास्तव मागविण्यात आलेल्या ई — निविदातील प्राप्त एकुण ५ निविदापैकी मे. राजेश एस रंगारी यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा २१.५१% कमी दराची राशी रू. ३०,८२,४८८/—(तीस लक्ष ब्यांशी हजार चारशे अठयांशी फक्त) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 396:— प्रभाग क्र ११, अ गोरेवाडा स्लम येथे भुमिगत पाईलाईन
{लोककर्म झोन 10} चे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई — निविदातील प्राप्त एकुण ७ निविदापैकी मे. बी. डी. काळे कंन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा १४.६०% कमी दराची राशी रू. ३३,६२,५४०/— (तेहतीस लक्ष बासस्ठ हजार पाचंशे चाळीस फक्त) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 397:— प्रभाग क्र ११ अ व ब गोधणी रोड ते गोकुलधाम, सुमीत
{लोककर्म झोन 10} नगर येथे रस्त्यांचे डांबरीकरणाचे कामास्तव मागविण्यात आलेल्या ई — निविदातील प्राप्त एकुण ४ निविदापैकी मे. ओ. जी. बजाज यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा ०.९९% कमी दराची राशी रू. २९,६५,७३०/— (एकोणतीस लक्ष पासस्ठ हजार सातशे तीस फक्त) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 398:— प्रभाग क्र ११, अ झिंगाबाई टाकळी येथे सी. सी. रोड व
{लोककर्म झोन 10} सी. सी. पेव्हेमेंटचे कामास्तव रू. ४९,८७,८१८/— (एकोणपन्नास लक्ष सत्यांशी हजार आठशे आठरा रूपये फक्त) रक्कमेच्या प्राकलनाास पद क्र. A४२००१३७४६०२ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच या कामास्तव मागविण्यात आलेल्या ई — निविदातील प्राप्त एकुण ६ निविदापैकी मे. मुकेश कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलणीय राशी पेक्षा १५.२१% कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ४२,२९,१७० (बेचाळीस लक्ष एकोणतीस हजार एकशे सत्तर फक्त) रक्कमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 399:— प्रभाग क्र ११ अ गोरेवाडा स्लम येथे सी. सी. रोडचे
{लोककर्म झोन 10} कामास्तव मागविण्यात आलेल्या ई निविदातील एकुण ७ अहर्ता प्राप्त निविदापैकी मे. आर. बी. केवलरमाणी यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा १७.५६% कमी दराची राशी रू. ३९,५७,१४५/— (एकोणचाळीस लक्ष सत्तावन हजार एकशे पंचेचाळीस रूपये फक्त) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 400:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 25, (ब) येथे हजारे यांचे ऑफीस पासुन ते काशीनाथ रारोकरयांचे घरपर्यंत विनोबाभावे नगर येथे सिमेंट रोड चे बांधकाम करण्याचे कामास्तव रू. 49,39,846/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 401:— {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 25, (ब) कुर्वे यांचे घरा पासुन ते खुशाल किराणा, अंम्बेनगर भांडेवाडी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. 44,68,218/— रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 402:— {अग्निशमन विभाग} विभागीय अधिकारी/वर्गाचे सुधारित गणवेष व गणवेष साहित्य नियमावली नुसार निम्नतम निविदा दराने गणवेष व गणवेष साहित्य खरेदी करणेबाबत.

मंजुर स्थायी समिती ठराव क्र. 728 दि. 18.11.2016 प्रमाणे अधिकारी/कर्मचारी वर्गाचे गणवेष व गणवेष साहित्य खरेदी कार्याची चौथ्यांदा निविदा मागविण्यात आली होती. ज्यामध्ये खालील निम्नतम निविदाकार यांचे दर प्राप्त झाले.

1) Tender ID No. : 2017_NMCN_236152_1 (Group “A”)

| Sr No | Articles | Specification | Qty. | Estimate Cost | M/s. S.S.S. Associates, Nagpur |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Tunic | Flame Retardant jacket made from 100% Cotton FR Fabric of 340 g/m2 (+/-10%) Fabric should be certified to following EN Standard<br>*Certified to EN ISO 11611 :2007 Class 1,A1<br>*Certified to EN ISO 11611:2008 Class A1, A2, B1, C1, D0, E3, & F1<br>*Certified to NFPA 2112for flame retardency<br>*Certified to EN 61482<br>*Certified to OEKO-TEX Standard 100. Product Class 1 for safe use With human skin Contact with Buttons. | 271 Nos. | 35,23,000 | 34,34,925 |
| | | | Taxes | | Excluding |
| | | | Total Amount | | 34,34,925 |
| | | Lowest Rate of M/s. S.S.S. Associates, Nagpur is below 2.50% | | | |

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन कार्यालयाचे पत्र क्र. अ.आ.से./1377/प्र.अ.अ. दिनांक 18/01/2018 च्या अनुषंगाने गृप ‘A’ विभागाने तांत्रिक पडताळणी करावी तसेच निविदेमधील गुणात्मक विनिर्देश तपासावे व पुन्हा प्रस्ताव स्थायी समिती समोर ठेवावा या सुचनेसह गृप ‘A’ चा प्रस्ताव कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

2) Tender ID No. : 2017_NMCN_236246_1 (Group “B”)

| Sr. No. | Articles | Specification | Qty. | Estimate Cost | M/s. Manohar Sakode & Bros., Nagpur |
|---|---|---|---|---|---|
| 2 | Trouser | Navy blue, Sapphire cloth trouser of Raymond make Quality (code) No. 415384, shade No. 009 with big Loop for the belt- | 249 Pairs | 28,01,500 | 20,73,110 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | Shirt White & Navy Blue | Raymond Make (Trovin) Code No.2073903, shade No 001 (White) tucking shirt (half sleeves) with 2 breast pocket, shoulder flaps, liberty collar<br>Sky Blue Bombay Dying or Raymond Make (Trovin) tucking shirt with 2 breast pocket ,shoulder flaps, liberty collar including stitching charges | 277 Pairs | | |
| 4 | Rain Coat | Navy blue colour Shirt pant & cap<br>शर्टाच्या पाठीमागे रेडीयम मिश्रीत लाल रंगाने (नेव्ही ब्ल्यु विथ रीफ्लेक्शन स्ट्रिप) विभागाचे नाव व सिंबल छपाई केलेले सुपर क्वॉलिटी वॉटर प्रुफ असलेले | 277 Pairs | | |
| 5 | Jerkeen | Navy Blue Woolen Search Raymond Mill, shoulder and elbow flaps. | 277 Nos. | | |
| | | | Taxes | | Excluding |
| | | | Total Amount | | 20,73,110 |
| | | Lowest Rate of M/s. Manohar Sakode & Bros., Nagpur is below 26% | | | |

प्रश्न समितीने विचारात घेऊन गृप 'B' च्या प्रस्तावास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

3) Tender ID No. : 2017_NMCN_236259_1 (Group "C")

| Sr. No. | Articles | Specification | Qty. | Estimate Cost | M/s. Manohar Sakode & Bros., Nagpur |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Gum Boot | Full Length of Gumboot 01 Pair water Proof IS Mark, black colour With yellow shade on Sole. | 277 Pairs | 15,23,500 | 9,75,040 |
| 2 | Leather Shoes | Oxford pattern/ Ambassador Bata Make Black Leather shoes, Superior Quality | 277 Pairs | | |
| 3 | Helmet | Yellow, White, Silver, Red Colour Safety Helmet ISI Mark with Monogram | 277 Nos. | | |
| | | | Taxes | | Excluding |
| | | | Total Amount | | 9,75,040 |
| | | Lowest Rate of M/s. Manohar Sakode & Bros., Nagpur is below 36% | | | |

प्रश्न समितीने विचारात घेऊन गृप 'C' च्या प्रस्तावास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

4) Tender ID No. : 2017_NMCN_236264_1 (Group "D")

| Sr. No. | Articles | Specification | Qty. | Estimate Cost | M/s. Manohar Sakode & Bros., Nagpur |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Socks | Navy Blue Socks -02 pairs. | 554 Pair | 10,21,440 | 4,49,433.58 |
| 2 | Lanyard | Whistle &Lanyard 38"length Black Colour Double Line | 277 Nos. | | |
| 3 | Pea Cap | 1. Peak Cap with 2 metal buttons, NFES Monogram with Satin Jari Embroidery & Jari wreath (Golden, Silver Satin Jari) on peak with satin ribbon | 28 Nos. | | |
| 4 | Barried Cap | NFES Monogram with Satin Jari Embroidery. | 249 Nos. | | |
| 5 | Leather Belt & Buckal | Best Quality Black Leather belt 2½" With steel buckle embossed/ etched monogram with NFES (As per department sample) | 277 Nos. | | |
| 6 | Overall | Navy blue colour overall with Breast pocket and shoulder flaps. | 12 Pair | | |
| 7 | T-Shirt | Dark Blue with logo | 24 Nos. | | |
| 8 | Service Name Plate | Length- 4 Cm., Height 1.3 Cm., White Metal | 277 Nos. | | |
| 9 | Shoulder Title, | Blue Flap :- Two Embroidery Bar ½ inch | 277 Pair | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | Shoulder Batch | wide and 1 & ½ inch long circular Cross section with flat bottom surface | | | |
| 10 | Shoulder Title, Impeller | Impeller I", ¾", ¼" | 120 Pair | | |
| 11 | Tie | Navy Blue colour woolen silk/Nylon or Terricoat | 28 Nos. | | |
| | | | Taxes | | Excluding |
| | | | Total Amount | | 4,49,433.58 |
| | | Lowest Rate of M/s. Manohar Sakode & Bros., Nagpur is below 56% | | | |

प्रश्न समितीने विचारात घेऊन गृप 'D' च्या प्रस्तावास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

करीता पृष्ठ क्र. 1 ते 3 पर्यंत वर दर्शविण्यात आलेले मंजूर गणवेश व गणवेष नियमावली प्रमाणे Group "A" मधिल नमुद अधिकारी /कर्मचारी वर्गाचे गणवेष व गणवेष साहित्याचे निम्नतम निविदाकार M/s. S.S.S. Associates, Nagpur यांचेकडून निम्नतम निविदा दर रू. 34,34,925 तसेच Group "B", "C", "D" मधील नमुद गणवेष व गणवेष साहित्याचे निम्नतम निविदाकार M/s. Manohar Sakode & Bros., Nagpur यांचेकडून निम्नतम निविदादर रू. 34,97,583.58 प्रमाणे खरेदी करून घेण्याचे विषयास स्थायी समितीने एकमताने विचारात घेवून गणवेष व गणवेष साहित्य खरेदीच्या विषयास मंजुरी प्रदान करून घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन गृप 'A' चा प्रस्ताव कार्यालयास परत करुन गृप 'B', गृप 'C', गृप 'D' च्या प्रस्तावास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 403:— {लोककर्म झोन 06} प्रभाग क्र. 39 श्री संत नगाजी मठ पंचकमेटी घर नं. 364, शीट नं. 190, सीएस नं. 249, 242 रा. आयचित मंदीर महाल येथे समाजभवनाचे बांधकामास्तव मे. संतोष खरपकर यांची प्राकलनिय दरांपेक्ष 3.51 टक्के प्रतिशत ने दरांची रु. 46,54,666/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 404:— {लोककर्म झोन 02} प्रभाग क्र. 12 क दाभा वस्ती देशमुख ले—आऊट, दांडेकर ले—आऊट येथील रस्स्त्यांच्या डांबरीकरणाच्या रु. 39,99,269/— च्या प्राकलनास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 405:— {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 7 (ब) अंतर्गत आनंद बुध्द विहार ते सरदार भाई यांचे घरापर्यंत रोडचे सिमेंटकरण करण्यास्तव रु. 47,62,422/— रकमेच्या प्राकलनास मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 406:— {अभियोक्ता विभाग} नागपूर शहरातील केळीबाग रोडचा रूंदीकरण महानगरपालिकेद्वारे मंजुर असून हा प्रकल्प मा. उच्च न्यायालयात याचिका क्र. 1501/2016, 1448/2016, 1395/2016 व 5056/2016 अन्वये आव्हानीत करण्यात आलेला होता व मा. उच्च न्यायालयाने उक्त याचिका दिनांक 18/10/2016 रोजी खारीज केली. दिनांक 18/10/2016 रोजीच्या आदेशाविरूध्द मा. सर्वोच्च न्यायालयात एस.एल.पी. क्र. 35652/2016, 36341—42/2016, 35867/2016, 36301/2016 दाखल करण्यात आलेली आहे. प्रस्तुत अपीलांमध्ये अपीलार्थींच्या वतीने वरिष्ठ अधिवक्ता (सिनीअर ॲडव्होकेट) लावण्यात आलेले असून नागपूर महानगरपालिकेचे सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता श्री. गगन सांघी यांनी महानगरपालिकेच्या वतीने वरिष्ठ अधिवक्ता

श्री. शेखर नाफडे, नवी दिल्ली यांना नियुक्त करण्याची शिफारस केलेली होती. मा. निगम आयुक्त यांच्या निर्देशान्वये वरिष्ठ अधिवक्ता श्री. शेखर नाफडे, नवी दिल्ली यांना विचारणा केली असता प्रती सुनावणी रू. 5,50,000/– प्रमाणे हजर राहण्यास त्यांनी सहमती दर्शविलेली आहे. प्रकरणाचा गांभीर्य पाहता आवश्यक असेल तेव्हा सुनावणी करीता वरिष्ठ अधिवक्ता श्री. शेखर नाफडे, नवी दिल्ली यांना प्रती सुनावणी रू. 5,50,000/– प्रमाणे नियुक्त करण्याचा मा. आयुक्तांच्या आदेशाला मंजुरी प्रदान करण्याच्या शिफारसीसह प्रस्ताव सादर प्रस्तुत.

उपरोक्त प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 407:– {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 23 अ शास्त्रीनगर येथे श्री अंबागडे ते श्री क्षिरसागर यांचे घरापर्यंत नाग नदीला संरक्षण भिंतीचे बांधकाम करणे कामास्तव रू. 31,02,940/– राशिचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

सदर कामाकरीता मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी पद क्र. A 43901370812 मधुन आर्थिक वर्ष 2017–18 मध्ये रू. 31,03,000/– लक्ष राशीची तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे.

ठराव क्रमांक 408:– प्रभाग क्र. 27 – अ अंतर्गत बापुनगर, मिरे ले–आऊट {लोककर्म झोन 05} व गुरूदेव नगर रोडचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 58,85,220/– च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 409:– {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र. १० (अ व ड) गाडगेबाबा सोसायटी, शिलानगर, दशरथनगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रू. २९,९६,७१४/– (एकोणतीस लक्ष छयानऊ हजार सातशे चौदा रूपये फक्त ) नविन पद क्र. A२२००१३३०८०३ व जुने पद क्रमांक ६८२ (Fix Priority) अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 410:– {लोककर्म झोन 04} प्रभाग क्र. 35 ब अंतर्गत संत गजानन सोसा. समाजभूषण सोसा. आदिवासी सोसा. व मनिष नगर परिसरात रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकुण 03 निविदापैकी निम्नतम निविदाकार में. फोनेक्स इंजीनिअरींग हयांची मुळ प्राकलनीय दराची निविदा रूपये 49,99,695/- (रूपये ऐकोनपन्नास लक्ष नव्यानऊ हजार सहाशे पंच्यांनऊ रूपये फक्त) स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच हे काम पद क्रमांक (680) A42001324612 अंतर्गत प्रस्तावित आहे. तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 411:– {लोककर्म झोन 01} प्रभाग क्र. 38 'ब' अंतर्गत एकात्माता नगर मेन रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. ४९,९८,१३८/– (एकोनपन्नास लक्ष, अठ्ठयान्नव हजार, एकशे अडतीस फक्त) रकमेच्या प्राकलनास मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A22001330801 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 412:— प्रभाग क्र. 38 'ब' जयताळा अंतर्गत विजय विहार ते ससाने
{लोककर्म झोन 01} लेआउट, शारदानगर येथील रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रू. ३६,९०,६१४/— (छत्तीस लक्ष, नव्वद हजार, सहाशे चौदा फक्त) रकमेच्या प्राकलनास मंजुरी करण्याचा तसेच पद क्र. A42001374612 अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 413:— प्रभाग क्र. ३४ अवधुत नगर येथील रस्त्यांचे डांबरीकरण
{लोककर्म झोन 03} करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण तीन निविदारांपैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची प्राकलनीय दरापेक्षा ७.८९ टक्के कमी दराची रू. ४६,०५,४७९/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 414:— प्रभाग क्र. ३४—क जानकी नगर ते न्यु अमर नगर येथील
{लोककर्म झोन 03} येथील रस्त्यांचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव प्राप्त एकूण तीन निविदारांपैकी मे. ओ.जी. बजाज यांची प्राकलनीय दराची रू. ४७,१७,२६९/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 415:— नागपूर महानगरपालिकेच्या मालकीचे १) तुळशीबाग गार्डन
{जाहिरात विभाग} २) भाऊजी पागे गार्डन ३) लकडगंज गार्डन ४) बापकर उद्यान, कॉटन मार्केट, सुभाष रोड, नागपूर ५) बालाजीनगर गार्डन, मानेवाडा रोड येथे सकाळी आणि संध्याकाळी ध्वनीक्षेपणावर संगीत वाजुवन दर १५ मिनीटानंतर १ मिनीटाची व्यवसायीक जाहिरात (Audio Advertisement) करण्यास्तव परवानगी देण्याबाबतचा प्रस्ताव खालील अटी व शर्तीवर मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

१. प्रथम शोधकर्ता (First Finder Policy) अंतर्गत बोर्डचे स्ट्रक्चर म.न.पा. ला हस्तांतरीत करावे लागतात. परंतु सदर्हु ध्वनीक्षेपण म.न.पा. तर्फे पुर्वीपासुन लावण्यात आलेल असल्यामुळे ही अट एजेन्सीस बंधनकारक राहणार नाही. परंतु संपर्ण ध्वनीक्षेपण संचाचे रखरखाव आणि चालु स्थितीत ठेवणे आणि कंत्राट संपल्यावर त्याच स्थितीत हस्तांतरीत करणे बंधनकारक राहील.
२. प्रिमीयमच्या स्वरुपात रु. ५,०००/— प्रती उद्यान प्रमाणे एकुण रु. २५,०००/— वार्षीक शुल्क आकारण्यात येईल.
३. सदर्हु ध्वनीक्षेपणाकरीता वापरण्यात येणारा विद्युत खर्च सबंधीत एजेन्सीव्दारे वहन करण्यात येईल.
४. महानगरपालिकेव्दारे काही शासकीय कार्यक्रमाकरीता किंवा विविध सामाजिक योजनांबाबत वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार जाहिराती करावयाच्या असल्यास त्या जाहिराती विनामुल्य प्रसारीत कराव्या लागतील.
५. ध्वनी प्रदुषन नियम २००० मधील परिशिष्टात नमूद ध्वनी प्रदुषण विषयक विहीत मर्यादा पातळीचे निकष पाळणे एजेन्सीधारकास बंधनकारक राहील.
६. ध्वनीक्षेपणाव्दारे जाहिरात प्रसरणाची फक्त वेळ सकाळी २.३० तास व सायंकाळी २.३० तासापर्यंत करणे बंधनकारक राहील.

ठराव क्रमांक 416ः— प्रभाग क्र. ३४ (ब) अंतर्गत विणकर कॉलनी येथे सिमेंट {लोककर्म झोन 03} कॉक्रिट रोडचे बांधकाम करण्यास्तव रू. ४९,८३,३०३/— च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या तसेच पद क्र. A42001470511 अंतर्गत तरतुद मुक्त करून या कामाची रितसर निविदा बोलाविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 417ः— प्रभाग क्र. 3 (ड) अंतर्गत पांडे वस्ती येथील नुरी मस्जिद {लोककर्म झोन 09} पासुन ते श्री गुप्ताचे घरापर्यंत ड्रेन लाईन व सी.सी. रोडचे बांधकाम करण्यास्तव रु. 36,28,130/— रकमेच्या प्राकलनास मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 418ः— प्रभाग क्र. 2 (अ) अंतर्गत डॉ. आंबेडकर कॉलोनी येथील {लोककर्म झोन 09} रोडचे सिमेंटीकरण करण्याच्या कामाकरिता प्राप्त चार निविदांपैकी मे. हितेश कन्स्ट्रक्शन यांची मुळ प्राकलनीय राशी रु. 29,99,609/— पेक्षा 00.9999 टक्के कमी दराची रू. 29,69,616/—(अक्षरी रूपये एकोणतीस लक्ष एकोणसत्तर हजार सहाशे सोळा) ची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न तसेच, हे काम पद क्र. 681 (A22001330802) अंतर्गत प्रस्तावित असल्याने कामाचा खर्च प्रावधान राशी पर्यंत सीमित ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 419ः— महानगरपालिका यांची नव्याने हद्दवाढ झालेल्या भागात {लोककर्म झोन 03} नागरी सोयी सुविधांचा विकास करण्यासाठी विशेष अर्थसहाय्य योजने अंतर्गत मौजा— हुडकेश्वर येथील Recreational Ground चे स्थापत्य विषयक बांधकाम करण्याच्या कामास्तव मागविण्यात आलेली ई—निविदातील प्राप्त एकूण चार निविदाकाराची निविदांपैकी मे. मुसळे डेव्हलपर्स यांची प्राक्कलनीय दरापेक्षा १२.५२ टक्के कमी दराची प्रथम निम्नतम निविदा राशी रू. ८८,७३,४३६/— रकमेची निविदा मंजूर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 420ः— प्रभाग क्र. ११ अ मानकापुर घाट येथे नाल्याचे भिंतीचे {लोककर्म झोन 10} कामास्तव मागविण्यात आलेल्या ई—निवदातील प्राप्त एकुण ९ निविदापैकी मे. ७८६ कन्स्ट्रक्शन ॲन्ड डेकोरेशन यांची मुळ प्राकलनीय राशी पेक्षा १८.०१ टक्के कमी दराची राशी रु. ७७७३७५९/— (सत्त्याहत्तर लक्ष त्र्याहत्तर हजार सातशे एक्कोनसाठ रुपये फक्त) रकमेची प्रथम निम्नतम दराची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 421 :— मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 (सुधारणा) व नागपूर शहर {सचिवालय वि.} महानगरपालिका अधिनियम 1948 (निरसन) 2011 (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम) मधील कलम 20 (3) अन्वये स्थायी समितीच्या 16 सदस्यांपैकी निम्मे 8 सदस्य दिनांक 01.03.2018 रोजी दुपारी निवृत्त होतील याचे नावांचे निर्धारण चिठ्ठया टाकून ठरविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निगम सचिवांनी या संदर्भात करण्यांत येणारी कार्यवाही मा. सभापती यांच्या अनुमतीने सुरू केली. निगम सचिव यांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 20(3), 20(4) व 20(5) चे वाचन स्थायी समिती समक्ष केले. तसेच 16 मा. सदस्यांच्या चिठ्ठ्या तयार करण्यांत आल्या असून त्यात 8 चिठ्ठ्या कायम व 8 चिठ्ठ्या निवृत्त आहे. त्या सर्व चिठ्ठ्या स्थायी समिती सदस्यांना दर्शविण्यांत आल्या. यानंतर या सर्व चिठ्ठ्या सर्वासमक्ष योग्य घडी करुन त्या पारदर्शक दब्यामध्ये मध्ये टाकून एकत्रित करण्यांत आल्या.

मा. सभापती यांनी उपरोक्त चिठ्ठ्यां डब्यातुन कश्या काढवयाच्या आहेत या संदर्भात मा. सदस्यांना अवगत केले. तसेच मा. सभापती यांनी मा.सदस्यांच्या उपस्थित असलेल्या योग्य क्रमवारीनुसार चिठ्ठ्या पारदर्शक डब्यामधुन काढण्याचे सूचविले व त्यावर प्रत्येकांनी स्वतः नांव व स्वाक्षरी करण्यांचे कळविले त्यानंतर पारदर्शक डब्यामधील चिठ्ठ्यां पुन्हा एकत्रित केल्यानंतर पारदर्शक डब्यामधुन चिठ्ठ्या काढण्यांस सुरूवात करण्यांत आली. आजच्या सभेला स्थायी समितीच्या मा. सदस्या श्रीमती मनिषा सुनिल कोठे या अनुपस्थित असल्यामुळे त्यांच्या नांवाची चिठ्ठी मा. सभापती, स्थायी समिती यांनी दिलेल्या निर्देशानुसार मा. मुख्य अभियंता यांनी काढली त्या नंतर मा. सभापती, स्थायी समिती यांनी उरलेली एक चिठ्ठी पारदर्शक डब्या मधून काढली. त्या पुढीलप्रमाणे निघाल्या असून त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहे.

कायम सदस्य

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 3. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 4. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 5. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 6. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 7. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 8. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

निवृत्त सदस्य

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | पद |
|---|---|---|
| 1. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 2. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 3. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 4. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 5. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 6. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 7. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 8. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |

उपरोक्त निवृत्त सदस्यांच्या जागा भरण्याकरिता स्थायी समितीने महानगरपालिकेस एकमताने शिफारस केली.

ठराव क्रमांक 422 :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर